Downloaded from rtepl.org
For Consultation, please call at 8303904870 or visit at rtepl.org



# उल्हासनगर महानगरपालिका

## महिला व बालकल्याण विभाग

## निविदा सुचना क्र. ०१ /उमपा/मबाकवि/ /२०२५

उल्हासनगर शहरातील गरजु दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, महिला/मुलींना
कॉम्पुटर टॅली प्रशिक्षण देणे बाबत.

## सन २०२५-२०२६

Downloaded from rtepl.org
For Consultation, please call at 8303904870 or visit at rtepl.org



# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

**महिला व बालकल्याण विभाग**

**निविदा सुचना क्र. ०१ सन २०२५-२०२६**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागासाठी सन २०२५-२०२६ करीता उल्हासनगर शहरातील गरजु, दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, महिला/मुलींना कॅाम्पुटर टॅली प्रशिक्षण देणे बाबत मान्यता प्राप्त असलेल्या अधिकृत संस्था यांचे कडून खालील तपशीलप्रमाणे ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने http://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून मागविण्यात येत आहे.

| अक्र. | कामाचे तपशिल | निविदेचा अंदाजित खर्च रक्कम (Total cost of tender) | निविदा सुरक्षा रक्कम (SD) | निविदा अनामत रक्कम (EMD) | निविदा फॉर्म फी (Tender Form Fee) | निविदाकाराकडुन प्रति लाभार्थी आकारण्यात येणारी रक्क़म (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उल्हासनगर शहरातील गरजु दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, महिला/मुलींना कॅाम्पुटर टॅली प्रशिक्षण देणेकरीता | २५ लाख | निविदा किमंतीच्या ५% रू. १,२५,०००/- | निविदा किमंतीच्या १% रू. २५,००,०००/- | ६०००/- +१०८० १८% GST = ७०८०/- | ---- |

**टिप :- १) निविदाकारानी निविदा दाखल करताना निविदाकाराकडुन प्रति लाभार्थी आकारण्यात येणारी रक्क़म उपरोक्त तक्त्यातील रकाना क्रमांक ७ मध्ये नमुद करावयाची आहे.**

**Schedule of Tender**

| Sr. No. | Activities | Start Date & Time -- Expiry Date & Time |
|---|---|---|
| 1 | Online Tender Release | **01/09/2025 : 15:00 Hrs** |
| 2 | Online Tender Document Download Upload/Submission | **01 /09/2025 : 15:00 Hrs To 15/09/2025 17 : 00 Hrs** |
| 3 | Pre-bidding date | **08 /09 /2025 : 12:00 Hrs** |
| 4 | Online Tender Opening | **16 /09/2025 : 15:00Hrs** |

१. निविदा महापालिकेच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०१/०९/२०२५ ते १५/०९/२०२५ च्या कालावधीमध्ये वेळ सांय ०५ : ०० पर्यंत विक्री व स्विकृती करता येतील.
२. निविदा पुर्व बैठक दिनांक ०८ /०९/२०२५ रोजी दुपारी १२ : ०० वाजता उप आयुक्त (मबाकवि), उल्हासनगर महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
३. प्राप्त झालेल्या एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी राखून ठेवलेला आहे.

(डॉ. किशोर गवस)
अतिरिक्त आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

Downloaded from rtepl.org
For Consultation, please call at 8303904870 or visit at rtepl.org



# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## निविदेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती

**कामाचे स्वरूप :-** : उल्हासनगर शहरातील गरजु दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, महिला/मुलींना कॅाम्पुटर टॅली प्रशिक्षण देणेकरीता अधिकृत नामांकित कंपनी/संस्थेमार्फत यांचेकडून "ई-निविदा" दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात आहे.

## निविदेची व्याप्ती :-

**वेळापत्रक :- निविदा प्रक्रियेबाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.**

| Sr. No. | Activities | Start Date & Time -- Expiry Date & Time |
|---|---|---|
| 1 | Online Tender Release | **01/09/2025 : 15:00 Hrs** |
| 2 | Online Tender Document Download Upload/Submission | **01 /09/2025 : 15:00 Hrs To 15/09/2025 17 : 00 Hrs** |
| 3 | Pre-bidding date | **08 /09 /2025 : 12:00 Hrs** |
| 4 | Online Tender Opening | **16 /09/2025 : 15:00Hrs** |

❖ निविदा महापालिकेच्या http://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून विक्री व स्विकृती करता येतील.

अ) निविदा कोणतेही कारण न देतांना नाकारण्याचा अधिकार आयुक्त महोदया, उलहासनगर महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

ब) निविदा अपलोड/सादर करते वेळी इच्छुक निविदाधारकांनी फॉर्मची किमंत रू. ७०८०/- (सर्व करासहित) भरणा करून (Credit Card/Debit Card/Net Banking Cash Card) इ. डाऊनलोड करण्यात येईल. ऑनलाईन भरणा करावयाचे आहेत.

क) सदर रक्कमेचा भरणा ई-टेंडरिंग एजन्सीला न केल्यास आपली निविदा स्विकृत करता येणार नाही व त्याकरीता महिला व बालकल्याण विभाग जबाबदार राहणार नाही.

ड) http://mahatenders.gov.in मध्ये E- tendering Tool Kit For Bidder मध्ये ई-टेंडरींग सर्वीस देणाऱ्याला ऑन लाईन पेमेंटची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

(टिप :- ई-टेंडरच्या कार्यवाही संदर्भात डिजीटल स्वाक्षरी करिता व इतर माहिती करिता उल्हासनगर महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्र ई-टेंडर विभागामध्ये संपर्क साधावा.

**निविदाधारकाने आपली निविदा दोन लिफाफा पध्दतीने ई-टेंडरव्दारे सादर करावयाची आहे.**

अ) निविदाधारकाने लिफाफा क्र. १ (Technical Envelope) मध्ये सादर करावयाचे दस्तऐवज

**खालीलप्रमाणे :-**

१) निविदाकार कोणताही व्यक्ती प्रोप्रायटर फर्म, किंवा कंपनी, लिमिटेड कंपनी, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नोंदणीकृत संस्था यापैकी असावी व नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करावी व निविदापत्रकावर स्वाक्षरी करण्यासाठी लेटर ऑफ ॲथारॉटी/पॉवर ऑफ ॲटर्नी दिली असल्यास त्याची प्रमाणित प्रत/नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

२) निविदाधारकाने स्वसाक्षांकित जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३) नेटवर्ध प्रमाणपत्र आवश्यक आहे. (Net worth Cst. C. A Certified)

४) निविदाधारकाने स्वसाक्षांकित पॅनकार्डची प्रत सादर करणे आवश्यक आहे.

५) ५ लाख संस्थेच्या खात्यावर शिल्लक जमा असणे आवश्यक आहे.

६) Professional Tax (PTRC/PTEC) जोडणे आवश्यक आहे.

Downloaded from rtepl.org
For Consultation, please call at 8303904870 or visit at rtepl.org



७) मागील आर्थिक तीन वर्षाची (२०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५) या सरासरी ५० लाख पर्यंत असल्याचे सनदी लेखापालाकडून (Charted Accountant) साक्षांकित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
८) ठाणे जिल्ह्यामध्ये संस्था / कार्यालय असणे आवश्यक आहे.
९) प्रशिक्षण केंद्र संस्थेच्या जागे करीता मालकीचे दुय्यम नोंदणी कार्यालयाचे कमीत कमी ३ वर्ष भाडे करार नोंदणी बाबतचे Index – २ असणे आवश्यक आहे.
१०) संस्था/कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र आवश्य़क आहे.
११) बँक सॉल्व्हन्सी प्रमाणपत्र. (३० लाखापर्यंत)
१२) निविदाधारक संस्थेने सदर संस्थेचे नाव कोणत्याही प्रकारच्या काळ्या यादीत नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र किंवा सदर संस्थेस कोणत्याही या शासकिय आस्थापनेशी व्यवहार करण्यास बंदी घालण्यात आलेली नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्य़क आहे.
१३) प्रशिक्षणासाठी वापरण्यात येणारे साहित्य़ ISO प्रमाणित वापरले जाईल याचे हमीपत्र सादर करणे आवश्य़क आहे.

**ब)** लिफाफा क्र. २ (Commercial Envelope) सादर करण्यात यावे.

लखोटा क्र. २ मध्ये प्रति लाभार्थी आकारण्यात येणारी रक्क़म नमुद करावयाची आहे. निविदाकारांनी लखोटा क्र. १ मधिल कागदपत्रे पुर्णपणे सादर केल्यास लखोटा क्र. २ मधिल सादर केलेले दर पत्रक उघडण्यात येईल.

**लखोटा क्र. १ मधिल कागदपत्रे अपूर्ण असल्यास क्र. २ चा लखोटा उघडण्यात येणार नाही.**

## निविदा अटी व शर्ती.

१. निविदाकार उल्हासनगर महानगरपालिकेचा थकबाकीदार नसावा. थकबाकीदार असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची थकीत रक्कम भरल्याशिवाय कार्यादेश देण्यात येणार नाही.
२. इच्छुक निविदाधारकांनी फॉर्मची किमं रू. ७०८०/- (ना परतावा ) केवळ Online Payment Mode ने करावी (Debit Card/Credit Card)
३. निविदाधारकाने अपलोड केलेली सर्व मुळ कागदपत्रे निविदा उघडते वेळी सादर करावयाची आहेत.
४. मुळ कागदपत्रे सादर न केल्यास निविदा समितीचा निर्णय अंतिम राहिल.
५. रू. ५०० मुल्यांच्या स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र निविदा उघडवयाच्या दिवशी महिला व बालकल्याण विभागात सादर करण्यात यावा, अन्यथा आपल्या निविदेचा अर्थिक लिफाफा उघडण्यात येणार नाही. तसेच आपले निविदेबाबत कोणतेही म्हणने ऐकूण न घेता निविदाधारकांस निविदा प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.
६. खालील कागदपत्रेही निविदा करारचा भाग समजण्यात येतील.
   अ) निविदा सुचना, निविदा प्रपत्र (Tender Form) निविदा पुर्व बैठकिचे इतिवृत्त.
   ब) देकाराचा नमुना –निविदा भाग – अ
७. न्युन्नतम निविदाधारकांस ७ दिवसांत एकूण देयकाच्या ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम FDR च्या स्वरूपात भरावी लागेल. तसेच आवश्यक करारनामा ही करावा लागेल.
८. उल्हासनगर शहरातील गरजु दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, मुलींना Computer Tally प्रशिक्षण देणेकरीता देणेसाठी विभागाने सांगितलेल्या ठिकाणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. त्याकरीता कोणताही अतिरिक्त खर्च दिला जाणार नाही.
९. ज्या संस्थेचे दर मंजुर करणेत येईल. त्यांनी ५% सुरक्षा रक्कम व स्वखर्चाने जनरल स्टॅम्प पेपरवर शपथ पत्रावर करारनामा सादर केल्या नंतर आदेश देण्यात येईल.
१०. उल्हासनगर शहरातील गरजु दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, महिला/मुलींना Computer Tally प्रशिक्षण देणेकरीता लागणारे साहित्य निविदाकारास आदेश मिळाल्यानंतर (१५ दिवसांत) उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

Downloaded from rtepl.org
For Consultation, please call at 8303904870 or visit at rtepl.org



११. निविदेत नमूद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील गरजु दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, महिला/मुलींना Computer Tally विहीत वेळेत प्रशिक्षण न दिल्यास दंडात्मक कारवाई म्हणून निविदेच्या १% दंड प्रति दिवस भरावा लागेल.
१२. सशर्त निविदा नाकारल्या जातील. तसेच सादर केलेला देकार निविदा उघडल्याच्या तारखेपासून १२० दिवस वैध राहील.
१३. सेवाकर व आयकर अधिनियमान्वये अनुज्ञेय असलेल्या कराची रक्कम स्वतंत्र्यपणे देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.
१४. निविदेत नमूद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता न केल्यास देयकाचा विचार केला जाणार नाही.
१५. सदर कामाबाबत कोणतीही तक्रार उल्हासनगर महानगरपालिकेकडे आल्यास प्राप्त तक्रारीची शहनिशा करून त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. आयुक्त तथा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांस राहील.
१६. निविदाधारकाने वैध कालावधी पूर्वी निविदा प्रकियेतून माघार घेतल्यास निविदे सोबत सादर केलेली निविदा इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.
१७. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त सो., उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी राखून ठेवलेला आहे.
१८. लाभार्थ्याची संख्या कमी अथवा जास्त होवू शकते. ते विभागाने आदेशित केल्यानुसार त्यांना Computer Tally प्रशिक्षण देणे बंधनकारक राहिल.
१९. तपासणीसाठी लागणारे साहित्य हे आय एस आय कंपनीची असावी.
२०. संपुर्ण बाबींचा विचार करून निविदाधारकाने वस्तु व सेवाकर जी.एस.टी (GST) सह आपले दर (SCHEDULE – B) सादर करावे.
२१. उल्हासनगर शहरातील गरजु दारीद्रय रेषेखालील/ आर्थीक दृष्टया दुर्बल, मुलींना Computer Tally प्रशिक्षण प्रशिक्षण देण्याच्या ठिकाणाचे Geo Tagging व्दारे फोटो जोडणे आवश्यक आहे.
२२. या निविदा पुर्वी प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या किमान ८० टक्के इतक्या प्रमाणात लाभार्थ्यांनी स्व्रत:चा व्यवसाय सुरु केले बाबतचे संबंधित शासकिय कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र निविदाकाराने सादर करणे अथवा प्रशिक्षणा अनुरुप प्रशिक्षणोत्तर प्रथम वेळी नोकरी उपलब्ध करुन देण्याची हमी आवश्यक आहे.

(डॉ. किशोर गवस)
अतिरिक्त आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका